# साखर आयुक्तालय,

**महाराष्ट्र राज्य,**

**साखर संकुल, शिवाजीनगर पुणे-४११००५**

दूरध्वनी क्रमांक- (०२०) २५५३८०४१-४४ ई-मेल- commsugar.fin@gmail.com


जा.क्र.साआ/अर्थ-६/ हमी पत्र/ टॅगींग वसुली/१२८८/सन २०२१,
दिनांक : ०९/१२/२०२१.

**वाचा** : १) मा.मंत्री समिती बैठक दिनांक १३/०९/२०२१ मध्ये दिलेले निर्देश.
२) साखर आयुक्तालयाकडील आदेश जा.क्र.साआ/अर्थ/कक्ष६/टॅगींगद्वारे वसुली व हमीपत्र/आदेश/४८८/सन २०२१ , दि.२४/०९/२०२१.
३) संबंधीत कारखान्यांनी सादर केलेली हमीपत्रे.

शासकीय अर्थसहाय्याची वेळेत वसुली व्हावी यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील झालेल्या विविध मंत्री समितीच्या बैठकांमध्ये बँकांनी साखर विक्रीच्या रकमेतून प्रति क्विंटल निश्चित केलेल्या दराने टॅगींगद्वारे रक्कम कपात करणेबाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार बँकांनी साखर कारखान्यांच्या साखर विक्रीच्या रकमेतून प्रति क्विंटल निश्चित केलेल्या दराने टॅगींगद्वारे रक्कम कपात करुन ती संबंधित कारखान्याच्या 'ड' खात्यामध्ये / स्वतंत्र खात्यामध्ये जमा करणे आवश्यक होते. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही.

२/- गाळप हंगाम २०२०-२१ चे कपातीचे धोरण निश्चित करते वेळेस बँकांनी कारखान्यांची संमती असल्याशिवाय अशी वसुली करणे योग्य होणार नाही असे मत मांडले. त्यानुसार दि. १३.०९.२०२१ रोजी झालेल्या मा. मंत्री समितीच्या बैठकीमध्ये त्यासंदर्भाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१) दिनांक ३१.०८.२०२१ अखेर पूर्ण एफ.आर.पी. रक्कम देणाऱ्या कारखान्यांचे 'अ' वर्गात वर्गीकरण करण्यात यावे. अशा **'अ' वर्गातील** साखर कारखान्यांकडून शासकीय भाग भांडवल, शासकीय कर्जे व हमी शुल्क वसुलीसाठी **टॅगींगद्वारे रु. ५०/- प्रति क्विंटल** कपात करावी.

२) दिनांक ३१.०८.२०२१ अखेर पूर्ण एफ.आर.पी. रक्कम न देणाऱ्या कारखान्यांचे ब वर्गात वर्गीकरण करण्यात यावे. अशा **'ब' वर्गातील** साखर कारखान्यांकडून शासकीय भाग भांडवल, शासकीय कर्जे व हमी शुल्क वसुलीसाठी **टॅगींगद्वारे रु. २५/- प्रति क्विंटल** कपात करावी.

३/- साखर कारखान्यांकडून टॅगींगद्वारे शासकीय देयबाकी वसुल करून घेण्यात यावी असे हमीपत्र गाळप परवान्यासोबत साखर आयुक्तांना साखर कारखान्यांनी सादर करावे व त्याआधारे सर्व मालतारण कर्ज पुरवठा करणाऱ्या बँकांनी वसुलपात्र शासकीय येणे बाकी रकमेची वसुली करावी असे आदेश साखर आयुक्तालयाने दि. २४/०९/२०२१ रोजी निर्गमीत केलेले आहेत.

४/- सदर आदेशानुसार मा. मंत्री समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करणेकरीता वसुलपात्र शासकीय देय बाकी असणाऱ्या 'परिशिष्ट अ' यादीतील साखर कारखान्यांनी साखर विक्रीच्या रकमेतून प्रति क्विंटल रु. ५०/- याप्रमाणे व परिशिष्ट 'परिशिष्ट ब' यादीतील साखर कारखान्यांनी रु. २५/- याप्रमाणे टॅगींग करुन शासकीय देय

बाकी वसुल करुन सदर रक्कम शासकीय कोषागारात भरणेबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी. सदरची कार्यपद्धती ही संपूर्ण देयबाकी वसुल होईपर्यंत लागू राहील.

५/- **कार्यपध्दती :-**

१) बँकेने टॅगींगद्वारे कपात केलेली रक्कम संबंधीत सहकारी बँकांनी कारखान्याच्या **'ड'** खात्यामध्ये व राष्ट्रीयकृत व्यापारी बँक, नागरी सहकारी बँक व इतर वित्तीय संस्थांनी या कारखान्याच्या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करावयाची आहे.

२) अशाप्रकारे रक्कम जमा झाल्यानंतर पुढील महिन्याचे पाच तारखेपर्यंत संबंधीत कारखान्यास बँकेकडून कळविण्यात यावे.

३) संबंधीत कारखान्याने सदर रक्कमेचे चलन संबंधीत विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर) यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावयाचे आहे.

४) प्रमाणित केलेल्या चलनाप्रमाणे 'ड' खात्यात व स्वतंत्र जमा झालेल्या रकमा बँकेकडून उपलब्ध करुन घेवून शासकीय कोषागारात एका आठवड्याच्या आत भरणा करावयाच्या आहेत व चलनाची एक प्रत प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना सादर करावयाची आहे. तसेच एक प्रत या कार्यालयाच्या commsugar.recovcell@gmail.com या ई-मेलवर पाठवावयाची आहे.

५) प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी २० तारखेपर्यंत साखर आयुक्तालयास विहित नमुन्यात अहवाल सादर करावयाचा आहे.

उपरोक्त बाबींचा व कार्यपद्धतीचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

मा. मंत्री समितीच्या दिनांक १३.०९.२०२१ च्या बैठकीतील निर्देशानुसार मी, शेखर गायकवाड, साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशाद्वारे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक / जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँक व इतर खाजगी बँक यांनी सोबतच्या परिशिष्ठातील साखर कारखान्यांच्या साखर विक्रीच्या रक्कमेतुन गाळप हंगाम २०२१-२२ पासून संपूर्ण देयबाकी वसुल होईपर्यंत टॅगींगद्वारे वसुल करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) 'परिशिष्ट अ' व 'परिशिष्ट ब' मधील सर्व साखर कारखान्यांनी टॅगीगद्वारे वसुली करण्यास संमती दिलेली असल्यामुळे सदर रक्कम बँकांनी/वित्तीय संस्थांनी वसुल करावी.

२) 'परिशिष्ट अ' मधील साखर कारखान्यांच्या साखर विक्रीच्या रकमेतून रु. ५०/- प्रति क्विंटल टॅगींगद्वारे कपात करावी अशा साखर कारखान्यांची यादी व त्या साखर कारखान्यांचे संमतीपत्र या आदेशासोबत जोडण्यात येत आहे.

३) 'परिशिष्ट ब' मधील साखर कारखान्यांच्या साखर विक्रीच्या रकमेतून रु. २५/- प्रति क्विंटल टॅगींगद्वारे कपात करावी अशा साखर कारखान्यांची यादी व त्या साखर कारखान्यांचे संमतीपत्र या आदेशासोबत जोडण्यात येत आहे.

४) बँकेने टॅगींगद्वारे कपात केलेली रक्कम संबंधीत सहकारी बँकांनी कारखान्याच्या **'ड'** खात्यामध्ये व राष्ट्रीयकृत व्यापारी बँक, नागरी सहकारी बँक व इतर वित्तीय संस्थांनी या कारखान्याच्या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करावयाची आहे.

५) संबंधित कारखान्याने शासकीय वसुल रक्कमेचे चलन संबंधीत विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यात यावे.

६) प्रमाणित केलेल्या चलनाप्रमाणे 'ड' खात्यात व स्वतंत्र जमा झालेल्या रकमा बँकेकडून उपलब्ध करुन घेवून शासकीय कोषागारात एका आठवड्याच्या आत भरणा कराव्यात.

७) सदर टॅगीगद्वारे वसुल केलेली रक्कम ही बँकांनी/वित्तीय संस्थांनी शासकीय अर्थसहाय्याच्या भरणा करण्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास उपलब्ध करुन देवू नये.

८) जोपर्यंत या कार्यालयाकडून टॅगीगद्वारे कपात रद्द करण्याच्या सुचना प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत कपात चालू ठेवावी.

९) सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

सदरहू आदेश आज दिनांक ०९/१२/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी निर्गमित केले असे.

(शेखर गायकवाड)
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म., मुंबई.
विभागीय कार्यालय, कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद, नांदेड.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, सांगली.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, पुणे.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अहमदनगर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, औरंगाबाद.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, लातूर.
७. शाखाधिकारी, बंधन बँक, शाखा पैठण, जि. औरंगाबाद
८. शाखाधिकारी, बँक ऑफ बडोदा, शाखा औरंगाबाद, जि. औरंगाबाद.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, शामराव विठ्ठल सहकारी बँक लि., शाखा पुणे.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा अर्बन सहकारी पतसंस्था लि., शाखा औरंगाबाद.

प्रत,

१. विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर) (सर्व) यांनी शासकीय चलन प्रमाणित करुन देताना योग्य ते शासकीय लेखाशिर्ष नमुद करावे जेणे करुन जमा-ताळमेळ सुनिश्चीत होईल.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व) यांनी त्यांचे प्रादेशिक विभागातील सर्व संबंधीत साखर कारखान्यांची माहिती विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर) यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात यावी. एकत्रित बिनचूक माहिती, शासकीय चलनाचे छायांकीत प्रतीसह ई-मेलद्वारे साखर आयुक्तालयास पाठवावी.

३. मा. प्रधान सचिव (सहकार व पणन) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

परिशिष्ठ - अ

**साखर आयुक्तालयाकडील आदेश जा.क्र.साआ/अर्थ-६/ हमी पत्र/ टॅगींग वसुली/१२८९/सन २०२१, दिनांक : ०९/१२/२०२१ चे सहपत्र**

**हंगाम २०२१-२२ मध्ये साखर कारखान्यांकडून साखर विक्रीच्या रकमेतून रु. ५०/- प्रमाणे Tagging द्वारे वसुल करावयाच्या रक्कमेची माहितीदर्शविणारे प्रपत्र**

**(रक्कम रु. लाखात)**

| अ.क्र. | सहकारी साखर कारखान्याचे नाव | जिल्हा | वसूलपात्र शासकीय येणेबाकीचा तपशिल | | | | बँकेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शासकीय भागभांडवल | शासकीय कर्ज | शासकीय थकहमी शुल्क | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लि., कुडीत्रे, ता. करवीर, जि. कोल्हापूर | कोल्हापूर | ११६.५४ | ०.०० | ०.०० | **११६.५४** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, कोल्हापूर |
| २ | सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखाना लि., हमिदवाडा - कौलगे, ता. कागल, जि. कोल्हापूर | कोल्हापूर | ४५१.८८ | ०.०० | ११९.१६ | **५७१.०४** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, कोल्हापूर |
| ३ | विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि., यशवंतनगर, ता. शिराळा, जि. कोल्हापूर | सांगली | ०.०० | ३१९.९२ | ०.०० | **३१९.९२** | सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा चिखली |
| ४ | मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., मोहननगर, पो. आरग, ता. मिरज, जि. सांगली | सांगली | ८५५.०० | ०.०० | ०.०० | **८५५.००** | सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा आरग |
| ५ | राजाराम बापु पाटिल सहकारी साखर कारखाना लि., साखराळे, ता. वाळवा, जि. सांगली युनिट-३ (सर्वोदय सहकारी साखर कारखाना लि., करंदवाडी, ता. वाळवा, जि. सांगली.) | सांगली | ६६९.५० | ३१२.०५ | १९०.६२ | **११७२.१७** | सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा राजारामनगर-साखराळे |
| ६ | निरा-भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर - रेडा, ता. इंदापूर, जि. पुणे | पुणे | १२७१.०० | ३६६.५२ | १५१.८५ | **१७८९.३७** | पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा इंदापूर |
| ७ | कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना लि., बीजवडी, इंदापुर जि. पुणे | पुणे | ७२.७८ | ८३.४३ | ०.०० | **१५६.२१** | पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा बिजवडी |
| ८ | संत तुकाराम सहकारी साखर कारखाना लि., कासारसाई-दारुंब्रे, ता. मुळशी, जि. पुणे | पुणे | ११२१.२९ | ०.०० | ०.०० | **११२१.२९** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, पुणे |
| ९ | अथणी शुगर्स लि. (रयत सहकारी साखर कारखाना लि., शेवाळेवाडी, ता. कराड, जि. सातारा) | सातारा | १३५५.०० | ७००.२३ | ३२५.९२ | **२३८१.१५** | शामराव विठ्ठल सह. बँक लि. शाखा पुणे |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना लि., केशेगांव, ता. जि. उस्मानाबाद | उस्मानाबाद | ९५५.०० | ११६.९८ | ०.०० | **१०७१.९८** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, औरंगाबाद |
| ११ | वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि., आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर | अहमदनगर | २६०.०० | ०.०० | २७१.६२ | **५३१.६२** | अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा वृध्देश्वर फॅक्टरी |
| १२ | अगस्ति सहकारी साखर कारखाना लि., अगस्तिनगर, ता. अकोले, जि. अहमदनगर | अहमदनगर | ६९०.०० | ०.०० | २१.४६ | **७११.४६** | अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा अगस्तीनगर |
| १३ | श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सुमननगर, पो. बोधेगाव, ता. शेंवगांव, जि. अहमदनगर | अहमदनगर | ८७५.१० | १३९६.८६ | १९८.८८ | **२४७०.८४** | बुलढाणा अर्बन क्रेडीट सोसायटी लि., बुलढाणा शखा - औरंगाबाद |
| १४ | सचिन घायाळ शुगर्स लि. (संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि., पैठण, ता. पैठण, जि. औरंगाबाद) | औरंगाबाद | ०.०० | २०७९.०० | २३९.७७ | **२३१८.७७** | बंधन बँक शाख पैठण |
| १५ | श्री रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखाना लि., विहामांडवा, ता. पैठण, जि. औरंगाबाद | औरंगाबाद | ७७४.४९ | ०.०० | ०.०० | **७७४.४९** | औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा विहामांडवा |
| १६ | कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि. अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना युनिट - २ (सागर सहकारी साखर कारखाना लि., तिर्थपुरी, ता. घनसांगवर, जि. जालना.) | जालना | ८४.९९ | ०.०० | ०.०० | **८४.९९** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, औरंगाबाद |

## परिशिष्ठ - अ

**साखर आयुक्तालयाकडील आदेश जा.क्र.साआ/अर्थ-६/ हमी पत्र/ टॅगींग वसुली/१२८९/सन २०२१, दिनांक : ०९/१२/२०२१ चे सहपत्र**

**हंगाम २०२१-२२ मध्ये साखर कारखान्यांकडून साखर विक्रीच्या रकमेतून रु. ५०/- प्रमाणे Tagging द्वारे वसुल करावयाच्या रक्कमेची माहितीदर्शविणारे प्रपत्र**

**(रक्कम रु. लाखात)**

| अ.क्र. | सहकारी साखर कारखान्याचे नाव | जिल्हा | वसूलपात्र शासकीय येणेबाकीचा तपशिल | | | | बँकेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शासकीय भागभांडवल | शासकीय कर्ज | शासकीय थकहमी शुल्क | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १७ | रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि., रावसाहेबनगर, पो. सिपोरा बजार, ता. भोकरदर, जि. जालना | जालना | १३११.०० | ०.०० | ५१६.७८ | **१८२७.७८** | बँक ऑफ बडोदा शाख औरंगाबाद |
| १८ | छत्रपती सहकारी साखर कारखाना लि., सोनाजीरावनगर, सावरगाव, ता. माजलगांव, जि. बीड | बीड | ५९०.४१ | ०.०० | ७९.८२ | **६७०.२३** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, औरंगाबाद |
| १९ | श्री पुर्णा सहकारी साखर कारखाना लि., वसमतनगर, ता. वसमत, जि. हिंगोली | हिंगोली | ३८५.०५ | २४१७.८३ | ०.०० | **२८०२.८८** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, नांदेड |
| २० | टोकाई सहकारी साखर कारखाना लि., कुरुंदा, ता. वसमत, हिंगोली | परभणी | ६७१.८५ | ५६००.५६ | ०.०० | **६२७२.४१** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, नांदेड |
| २१ | रेणा सहकारी साखर कारखाना लि., निवाडा, ता. रेणापूर, जि. लातुर | लातुर | ७५१.२५ | ०.०० | ०.०० | **७५१.२५** | लातुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा मुख्य शाखा लातुर |

**( शेखर गायकवाड )**
**साखर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

## परिशिष्ट - ब

**साखर आयुक्तालयाकडील आदेश जा.क्र.साआ/अर्थ-६/ हमी पत्र/ टॅगींग वसुली/९२६९/सन २०२१, दिनांक : ०९/१२/२०२१ चे सहपत्र**

**हंगाम २०२१-२२ मध्ये साखर कारखान्यांकडून साखर विक्रीच्या रकमेतून रु. २५/- प्रमाणे Tagging द्वारे वसुल करावयाच्या रक्कमेची माहितीदर्शविणारे प्रपत्र**

(रक्कम रु. लाखात)

| अ.क्र. | सहकारी साखर कारखान्याचे नाव | जिल्हा | वसूलपात्र शासकीय येणेबाकीचा तपशिल | | | | बँकेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शासकीय भागभांडवल | शासकीय कर्ज | शासकीय थकहमी शुल्क | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे, ता. आजरा, जि. कोल्हापूर | कोल्हापूर | ९८०.०० | १३३९.४३ | ०.०० | **२३१९.४३** | कोल्हापूरजिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा गवसे |
| २ | छत्रपती सहकारी साखर कारखाना लि., भवानीनगी, ता. इंदापूर, जि. पुणे. | पुणे | १५७.३३ | ०.०० | ०.०० | **१५७.३३** | पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा भवानीनगर |
| ३ | किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना लि., किसनवीरनगर, ता. भुईंज, जि. सातारा | सातारा | ४६४.३५ | ०.०० | १६.०० | **४८०.३५** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, पुणे |
| ४ | श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि., मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | सोलापूर | ५१४.६० | ०.०० | ०.०० | **५१४.६०** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, पुणे |
| ५ | श्री.संत कुर्मदास सहकारी साखर कारखाना लि., गणपतराव साठे नगर, पडसाळी, माढा, सोलापूर | सोलापूर | १४८८.५६ | ०.०० | ०.०० | **१४८८.५६** | कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा माढा |
| ६ | सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना लि., भाळवणी, ता.पंढरपूर, जि. सोलापूर | सोलापूर | १८९९.३४ | ०.०० | १४.६९ | **१९१४.०३** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, पुणे |
| ७ | भिमा सहकारी साखर कारखाना लि., टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर | सोलापूर | २७५.७० | ०.०० | १९.३५ | **२९५.०५** | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई, विभागीय कार्यालय, पुणे |
| ८ | श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना लि., मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद | उस्मानाबाद | १३२०.९६ | ३५३.३५ | ८८४.१७ | **२५५८.४८** | बँकेचे नाव नमुद नाही |
| ९ | कुकडी सहकारी साखर कारखाना लि., पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | अहमदनगर | ६८८.६० | ०.०० | ०.०० | **६८८.६०** | अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा पिंपळगाव पिसा |

**( शेखर गायकवाड )**
**साखर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**